आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१९ जुलै २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार नवीन सहा विधेयकं सादर करणार
- चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीने भारतीय अर्थव्यवस्थेला गती मिळण्याचे संकेत दिल्याची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मासिक अहवालात माहिती
- बांगलादेशात विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर उसळलेल्या हिंसाचारात आतापर्यंत ३९ जणांचा मृत्यू
- मुंबई शेअर बाजारात सकाळच्या सत्रात सेन्सेक्सचा ८१ हजार ५८८ अंकांचा नवा उच्चांक

**आणि**

- महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानच्या संघात आज लढत

**<><><><><>**

पुढच्या आठवड्यात सुरू होत असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार नवीन सहा विधेयकं सादर करणार आहे. आपत्ती व्यवस्थापन कायद्यामध्ये काही सुधारणा सुचवणाऱ्या विधेयकासह अर्थविषयक विधेयकांचा यामध्ये समावेश आहे. विमान कायदा १९३४ ला पर्याय म्हणून वायुयान विधेयक २०२४ मांडण्यात येणार असून नागरी हवाई वाहतूक क्षेत्रात व्यवसाय करणं सुलभ व्हावं यासाठी त्यात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. लोकसभा सचिवालयानं

काल या आगामी विधेयकांची सूची जाहीर केली. येत्या २२ जुलै रोजी संसदेचं अधिवेशन सुरु होणार असून ते १२ ऑगस्टपर्यंत चालेल.

२३ जुलै रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतरामन अर्थसंकल्प सादर करतील. इतर विधेयकांमध्ये बॉयलर विधेयकाचा समावेश असून स्वातंत्र्यपूर्व काळातल्या कॉफी आणि रबर कायद्याला पर्याय म्हणून ते मांडण्यात येणार आहे. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कामकाज सल्लागार समिती स्थापन केली असून ही समिती संसदेच्या दैनंदिन कामकाजाचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचं काम करेल.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीने भारतीय अर्थव्यवस्थेला गती मिळण्याचे संकेत दिले आहेत, असं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. कृषी क्षेत्राबाबतचा नवा दृष्टिकोन, आणि ग्रामीण भागातली वाढती मागणी अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक ठरत असल्याचं रिझर्व्ह बँकेनं आपल्या मासिक अहवालात म्हटलं आहे. राष्ट्रीय सांख्यिकी विभागानं अलीकडेच केलेल्या मासिक दरडोई खर्चाच्या सर्वेक्षणानुसार, ग्रामीण खर्चाचं प्रमाण शहरी भागापेक्षा जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आर्थिक विषमतेची दरी कमी होत आहे. मनरेगा, अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा, यासारख्या योजनांमध्ये मजुरीचे वाढलेले दर आणि शहरात स्थलांतरित झालेल्या नातलगांकडून ग्रामीण कुटुंबांना पाठवल्या जाणाऱ्या पैशाचं मोठं प्रमाण, यामुळे ग्रामीण कुटुंबांची खर्च करण्याची क्षमता वाढत असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या सर्व राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनांच्या दर्शनी भागावर फास्ट टॅग नसेल, तर  दंड म्हणून दुप्पट टोल वसूल करण्याचे निर्देश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं सर्व टोल नाक्यांना दिले आहेत. अनेक वाहनं दर्शनी भागात काचेवर फास्ट टॅग लावत नाहीत, त्यामुळे टोल वसुलीत वेळ जातो, वाहनांच्या लांब रांगा लागतात आणि वाहतुकीचा खोळंबा होतो. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणानं एक हजार टोल नाक्यांना कठोर कारवाईच्या सूचना जारी केल्या आहेत. देशातल्या ४५ हजार किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गावरून रोज सुमारे ८ कोटी नागरिक फास्ट टॅगचा वापर करून प्रवास करतात.

**<><><><><>**

नीट-युजी प्रवेश परीक्षा पेपर-फुटी प्रकरणी सीबीआयनं आज रांची इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेच्या एका विद्यार्थिनीला अटक केली. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या २०२३ च्या तुकडीमधल्या या विद्यार्थिनीला चौकशीनंतर अटक करण्यात आली. सीबीआयनं या विद्यार्थिनीचा मोबाईल, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणं  जप्त केली आहेत.

झारखंडमधल्या रामगड जिल्ह्याची मूळ रहिवासी असलेल्या या विद्यार्थिनीनं पेपर फुटी प्रकरणातल्या आरोपींसाठी नीट परीक्षेचे पेपर सोडवले होते, असा तिच्यावर आरोप आहे.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स वस्तू निर्मिती क्षेत्रात २०३० पर्यंत भारताचा व्यापार पाचशे अब्ज डॉलर्स पर्यंत नेण्याचं उद्दिष्ट असल्याचं नीती आयोगानं म्हटलं आहे. नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांनी काल नवी दिल्लीत ‘इलेक्ट्रॉनिक्स वैश्विक मूल्य

साखळीत भारताची भागीदारी' हा अहवाल प्रसिद्ध केला, त्यात हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २०२३ मध्ये इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात भारताचा व्यापार १०१ अब्ज डॉलर्सने वाढला. यामध्ये मुख्यतः देशी मोबाइल उत्पादनाचा सर्वात जास्त वाटा असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या कीर्ती अर्थात खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं होणार आहे. तळागाळातल्या प्रतिभावान खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी कीर्ती हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. उपक्रमाचा पहिला टप्पा चंदिगड इथं सुरू झाला. या टप्प्यात ३ लाख ६२ हजार ६८३ खेळाडूंनी नोंदणी केली आहे. यात तिरंदाजी, ऍथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, फुटबॉल, हॉकी, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, वेटलिफ्टिंग आणि कुस्ती अशा ११ खेळांचा समावेश आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उसळलेल्या हिंसाचारात आतापर्यंत ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. सरकारी नोकऱ्यांसाठी कोटा प्रणालीत सुधारणा करण्याच्या मागणीसाठी ही निदर्शने सुरु आहेत. या हिंसाचारामुळे काल दुपारपासून मेट्रो रेल्वे आणि ढाक्याकडे जाणारी रेल्वे सेवा बंद करण्यात आली आहे. वृत्तवाहिन्या, वृत्तपत्र, तसंच मोबाईल इंटरनेट नेटवर्क सुद्धा बंद करण्यात आलं आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो

गुटेरेस यांनी बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या हिंसाचारावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमधल्या गोंडा रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या चार वर पोहोचली आहे. अपघातात गंभीर जखमी झालेल्या २  प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे.

उत्तरप्रदेशमध्ये काल दुपारी दिब्रुगडला जाणाऱ्या रेल्वे गाडीचे  २१ डबे रुळावरून घसरून झालेल्या अपघातात ३० प्रवासी जखमी झाले होते.  लखनौ-गोहाटी  मुख्य रेल्वे मार्ग पूर्ववत करण्याचं काम युद्धपातळीवर सुरू आहे. तसंच या मार्गावरच्या गाड्या इतर मार्गांवर वळवण्यात आल्या आहेत, अशी माहिती रेल्वेच्या सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज सुरुवातीच्या सत्रात ८१ हजार ५८८ अंकांचा नवा विक्रमी उच्चांक नोंदवला, मात्र जागतिक बाजारातल्या कमकुवत स्थितीच्या पार्श्वभूमीवर तो १६७ अंकांनी घसरला आणि ८१ हजार १७७ अंकांवर आला.

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीनं देखील सुरुवातीच्या सत्रात २४ हजार ८५५ अंकांचा नवा उच्चांक नोंदवला, मात्र त्यानंतर त्यामधे घसरण दिसून आली.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेसाठी जम्मू मधल्या भगवती नगर यात्री निवास बेस कॅम्पमधून आज ४ हजार ८२१ यात्रेकरूंची आणखी एक तुकडी काश्मीर खोऱ्याकडे रवाना झाली. दीडशे वाहनांच्या ताफ्यासह यात्रेकरूंनी आज पहाटे बेस कॅम्प सोडला.

यापैकी एक हजार ७३१ यात्रेकरू काश्मीर खोऱ्यातल्या बालताल बेस कॅम्पकडे, तर तीन हजार ९० यात्रेकरू पहेलगाव इथल्या बेस कॅम्प कडे रवाना झाले. तिथून पुढे ते अमरनाथ गुंफांकडे मार्गस्थ होतील.

**<><><><><>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आजपासून भूतानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. परराष्ट्र सचिवपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांचा हा पहिलाच परदेश दौरा आहे. या दौऱ्यात ते भूतानच्या राजाची भेट घेतील.

**<><><><><>**

युरोपियन संसदेनं जर्मनीच्या उर्सुला वोन डेर लेयेन यांची पुढच्या पाच वर्षांसाठी युरोपियन आयोगाच्या अध्यक्षपदी पुन्हा निवड केली. उर्सुला वोन डेर लेयेन यांना युरोपियन संघाच्या ७२० सदस्यांपैकी ४०१ सदस्यांची मतं मिळाली. निवड झाल्याननंतर उर्सुला यांनी आगामी पाच वर्षातल्या योजनांची माहिती युरोपियन संसदेत दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशाद्वारे उर्सुला यांची युरोपियन आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेमध्ये आज सुरू होणाऱ्या महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाचा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरू होईल. हरमनप्रीत कौर भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे. त्याआधी दुपारी दोन वाजता संयुक्त अरब अमिराती आणि नेपाळ यांच्यातल्या सामन्याने स्पर्धेची सुरुवात होईल.

स्पर्धेत अ आणि ब असे दोन गट असून भारतासह पाकिस्तान, नेपाळ आणि संयुक्त अरब अमिराती हे देश अ गटात आहेत.

**<><><><><>**

एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेने खलिस्तानी दहशतवादी लखबीर सिंग संधू उर्फ लांडा याचा प्रमुख साथीदार बलजीत सिंग याला काल मध्य प्रदेशातल्या बडवानी जिल्ह्यात अटक केली. शस्त्रांचा पुरवठा करणाऱ्या एका मोठ्या दहशतवादी नेटवर्क प्रकरणात बलजीत सिंग ला अटक करण्यात आली.

**<><><><><>**

महाराष्ट्र, गुजरात, गोवा, आंध्रप्रदेश आणि तेलंगणामध्ये तुरळक ठिकाणी आज अती जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज असून, या ठिकाणी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. गोवा, मध्य महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये उद्यापर्यंत ही परिस्थिती कायम राहील, असा अंदाज आहे.

मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड, ओदिशा, उत्तर कर्नाटक, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पूर्व राजस्थानमध्ये पुढले ४ दिवस जोरदार पाऊस पडेल, तर या काळात अंदमान आणि निकोबार द्वीप समूह, पश्चिम बंगालचा डोंगराळ प्रदेश,

ईशान्य भारत, जम्मू-काश्मीर, लडाख, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.